**<u>प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र. ०३ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

**<u>उलट तपास वादीतर्फे विधिज्ञ श्री.एम.बी.सुकाळी यांचेमार्फत सुरु.</u>**

५. हे म्हणणे खरे आहे की, मी महात्मा गांधी तंटामुक्ती समितीचा अध्यक्ष असल्याबाबतचा कोणताही लेखी पुरावा अभिलेखावर दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, तसा पुरावा दाखल करण्यास मला कोणताही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सरतपासातील नमूद तथाकथित ठराव पारीत करताना हजर होतो हे दाखविण्यासाठी माझ्याकडे कागदोपत्री पुरावा नाही.

६. हे म्हणणे खरे आहे की, मी मागील एक तारीख व आजच्या तारखेला साक्ष देण्यासाठी आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला कोर्टाने साक्षीसमन्स काढलेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मला मागील तारखेस साक्ष देण्यास अडचण नव्हती. माझ्याकडे ठरावाची प्रत नसल्यामुळे साक्ष देण्यामध्ये अडचण होती. हे म्हणणे खरे आहे की, मला साक्ष देण्याकरीता आज प्रतिवादीने न्यायालयात आणलेले आहे.

७. हे म्हणणे खरे आहे की, मला सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रामधील सर्व मजकूर सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सरतपासातील प्रतिज्ञापत्रामध्ये किती परिच्छेद आहेत हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी महात्मा गांधी तंटामुक्ती समिती तिरवडे चे कधीही अध्यक्ष नसल्यामुळे मी कोणत्या कालावधीत अध्यक्ष होतो हे नमूद करता आलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिज्ञापत्रामध्ये नमूद केलेल्या तथाकथित ठराव-जबाबाची झेरॉक्स प्रत ही खोटी आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकूर खरा व बरोबर आहे हे मी प्रतिवादींच्या सांगण्यावरुन खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तंटामुक्ती समिती व ग्रामपंचायतीला कथीत ठराव व जबाब नोंद व पारीत करण्याचा अधिकार नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादींच्या सांगण्यावरुन खोटे प्रतिज्ञापत्र दाखल करुन खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील नमूद मजकूर की, वादी व प्रतिवादीमध्ये तडजोड झाली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तशी कोणतीही

तडजोड झालेली नाही. हे मला माहित नाही की, वादींनी ग्रामपंचायतीने चुकीचे ठराव पारीत केल्यामुळे त्यांच्या वरिष्ठांकडे तक्रारी केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी खोट साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

एम.के.फकीह
दिवाणी न्यायाधीश क.स्तर मालवण.

दि. १७/०३/२०२६